पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र.७७ दिनांक १८/०९/२०२६

मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीस जेरबंद करण्यात पालघर पोलीसांना यश

दि.०६/०९/२०२६ रोजी ०१.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी श्री. दिलीप रामा हारके, वय ५३ वर्षे, रा. धरमपुर, बापुगाव, ता. डहाणु, जि. पालघर यांची होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल क्रमांक MH-48-AJ-8403 हि फिर्यादीच्या घराच्या ओटीवर उभी करून ठेवलेली असतांना रात्री ०१.३० वाजताच्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीशिवाय चोरी करून चोरून नेलेबाबत कासा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ।१७१/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे दिनांक ०८/०९/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाणेचे तपास पथक तयार करण्यात आले. सदर तपास पथकाने तांत्रिक विश्लेषन व गोपनीय माहितीच्या आधारे संशयीत इसम नामे रूचित सुभाष दोडे, रा. आंबेघर पाटीलपाडा, ता. विक्रमगड, जि. पालघर यास ताब्यात घेवून त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने तपास केला असता सदरचा गुन्हा हा त्यानेच केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे नमूद आरोपीस अटक करुन गुन्ह्यात चोरीस गेलेली MH-48-AJ-8403 क्रमांकाची मोटारसायकल ही जप्त करण्यात आली आहे. नमूद गुन्ह्याचा अधिक तपास हा पोहवा/४६६ महेश कडव, नेमणुक कासा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. समिर महेर, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि/अमर पाटील, प्रभारी अधिकारी, कासा पोलीस ठाणे, पोहवा/४६६ महेश कडव, पोशि/ठाळकर, पोशि/सय्यद, सर्व नेमणुक कासा पोलीस ठाणे यांनी केली आहे.